| MHBI150017992025 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४५९/२०२५</u>**<br>**(बबन वल्हाजी घोशीर**<br>**विरूध्द**<br>**कोणीही नाही)** |
|---|---|

## निशाणी ०१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७२ अनुसार मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे अर्जदार हे उत्तराधिकारी असलेबाबतचे उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथनाप्रमाणे, कोंडाबाई नाना घोशीर हया मौजे नाळवंडी ता.पाटोदा जि.बीड येथील रहिवासी होते व त्या दि. ०३.१२.२०२० रोजी मौजे नाळवंडी येथे मयत झालेल्या आहेत. मयत कोंडाबाई यांचे पती नाना निवृत्ती घोशीर हे सन १९७२ मध्ये मयत झाले आहेत. मयत कोंडाबाई व मयत नाना यांना अपत्य नाहीत. मयताची आई नामे लक्ष्मीबाई हि दि. ०२.११.२००४ रोजी व वडील नामे वाल्हाजी हे पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे दिर वाल्हाजी यांची मुले व मुली म्हणजेच मयत कोंडाबाई यांचे पुतणे व पुतणी आहेत. त्याप्रमाणे कोंडाबाई नाना घोशीर यांना अर्जदारा व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत.

३. कोंडाबाई नाना घोशीर यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, अंमळनेर, ता.पाटोदा, जि. बीड येथील त्यांचे मुदतठेव खाते क्रमांक ३९८२५०९९८५५ मध्ये रक्कम रुपये २,७०,०००/– व व्याज (दोन लाख सत्तर हजार व व्याज) जमा आहेत. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, अंमळनेर, ता.पाटोदा, जि. बीड येथील त्यांचे खाते क्रमांक ६२२३६५६३१४६ मध्ये रक्कम रुपये ८,५९०.६०/– व व्याज (आठ हजार पाचशे नव्वद रुपये व साठ पैसे व व्याज) जमा आहेत. अर्जदार मयताच्या नावे असलेली रक्कम आणण्यासाठी बँकेत

गेले असता सदर बँक अधिकारी यांनी मे.कोर्टाकडील उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) आणणेस अर्जदार यांना कळविले होते. त्यामुळे उत्तराधिकार प्रमाणपत्र गरजेचे असलेने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदार क्र. १ तर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **(नि.क्र.१०)** वरती दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथनाप्रमाणे आहे. अर्जदार यांनी मयत कोंडाबाई नाना घोशीर यांच्या मृत्युप्रमाणपत्राची सत्यप्रत **(नि.क्र.६),** मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे नावाचे बँक डिपोसीट रिसीप्ट नं.७२१०७९४७७२–८ **(नि.क्र.४ अनु.क्र.२)**, मयताचा खाते क्र. ६२२३६५६३१४६ च्या बँकेच्या खाते उताऱ्याची सत्यप्रत **(नि.क्र.४ सोबत अनु.क्र.३),** फेरफार क्र. ७८० ची छायांकित प्रत **(नि.क्र.४ अनु.क्र.४),** फेरफार क्र. १४२३/२६६ ची छायांकित प्रत **(निशाणी क्र. ४ अनु क्र. ५)** , गट नं. ४३ च्या सातबारा उताऱ्याची छायांकित प्रत **(निशाणी क्र. ४ अनु क्र. ६),** अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डच्या छायांकित प्रती **(निशाणी क्र. ४ अनु क्र. ८ ते ११)** तसेच ''दैनिक किसान'' मध्ये दिनांक १४/०१/२०२६ रोजी प्रसिध्द केलेली जाहीरनामा नोटीस **(नि.क्र.९)** हजर केली आहे. दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. अर्जदारातर्फे साक्षीदार क्र २ संजय दादाराव घोशीर यांनी शपथपत्र दाखल केले आहे अर्जदार यांनी पुरसीस **(नि.क्र.१४)** दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. ई.जी.काकडे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज दाखल झालेनंतर प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस '*'दैनिक बीड किसान'''* मध्ये दिनांक १४/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली. परंतु सदर नोटीसीच्या अनुषंगाने कोणीही हजर होऊन अर्जदार यांचे कथन नाकारलेले नाही. अर्जदार यांनी मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे नावाचे बँक डिपॉसीट रिसीप्ट **(नि.क्र.४ अनु.क्र.२)** दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत कोंडाबाई नाना घोशीर यांच्या नावे रक्कम रुपये २,७०,०००/– (दोन लाख सत्तर हजार) इतकी जमा असल्याचे दिसून येते.

अर्जदार यांनी मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे नावाचे बँक स्टेटमेंट **(नि.क्र.४ अनु.क्र.३)** दाखल केले आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत कोंडाबाई नाना घोशीर यांच्या नावे रक्कम रुपये ८,५९०.६०/– (आठ हजार पाचशे नव्वद रुपये साठ पैसे ) इतकी जमा असल्याचे दिसून येते. अर्जदारातर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, मयताच्या खात्यात असणारी रक्कम ही तिला तिच्या पतीकडून मिळालेल्या शेतजमीन विक्री मोबदल्यामधून मिळालेली आहे. शेत जमीन विक्री केल्या बाबतचा फेरफार क्र १६८ ची साक्षांकीत प्रत हजर केली आहे. अर्जदार यांच्या तोंडी पुराव्यास कागदोपत्री पुराव्यामुळे पुष्टी मिळत आहे.

७. थोडक्यात, अर्जदार यांच्या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. मयत कोंडाबाई नाना पती नाना निवृत्ती घोषीर हे मयत झाले असुन कोंडाबाई व नाना यांना वैवाहिक संबंधातुन अपत्य झालेले नाहीत. अर्जदाराचे कथनानुसार मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे पुतणे व पुतणी असे वारस आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ हे पुतणे व पुतणी या नात्याने कोंडाबाई नाना घोशीर यांचे हिंदु वारसा कायदा १९५६ च्या तरतुदीप्रमाणे वर्ग–१ चे वारस ठरतात. अशा प्रकारे अर्जदार हे मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते.

८. अर्जदारची कथने विना आव्हानित राहिलेमुळे असे प्रथमदर्शनी दिसून येते की, मयत कोंडाबाई नाना घोशीर यांना अर्जदार यांचेशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) देणे योग्य व संयुक्तिक होईल.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्र. १ बबन वल्हाजी घोशीर, अर्जदार क्र. २ अशोक वल्हाजी घोशीर, अर्जदार क्र. ३ सुमनबाई बाबासाहेब बहीरवाळ, अर्जदार क्र. ४ केशरबाई बबन डोंगर हे मयत

कोंडाबाई नाना घोशीर यांचे उत्तराधिकारी असलेबाबत भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ चे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र अर्जदार यांना देणेत यावे.

३. सदरचे उत्तराधिकार प्रमाणपत्र अर्जदार यांचेकडून नियमाप्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प भरुन घेऊन मयत कोंडाबाई नाना घोशीर यांचे नावे ३९८२५०९९८५५ मध्ये रक्कम रुपये २,७०,०००/– (दोन लाख सत्तर हजार) तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, अंमळनेर, ता.पाटोदा, जि. बीड येथील त्यांचे खाते क्रमांक ६२२३६५६३१४६ मध्ये रक्कम रुपये ८,५९०.६०/– (आठ हजार पाचशे नव्वद रुपये साठ पैसे ) इतकी जमा रक्कम मिळणेकरीता अर्जदार यांचे नांवे उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) देणेत यावे.

Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2026.05.07 17:53:51 +0530

**दिनांक – ०७.०५.२०२६**

**स्थळ – पाटोदा**

**(मिथुन अ. शिंदे)**
**प्रभारी सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**पाटोदा.**